स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मराठवाड्यातील सहकारी साखर कारखान्यांचा ऐतिहासिक अभ्यास.

पीएच. डी (इतिहास) पदवी परीक्षेसाठी

शोध प्रबंधाचा गोषवारा

इतिहास विभागामार्फत सादर

संशोधक

श्री शिवाजी सुभाष खिराडे

भाई किशनराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, चाकूर

ता. चाकूर जि. लातूर 413513

मार्गदर्शक

सह. प्रा. डॉ. रमेश दत्तात्रय गंगथडे

कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती

ता. अहमदपूर, जि. लातूर

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशील	पृष्ठ क्रमांक
1	प्रस्तावना	3
2	विषय निवडीचे महत्त्व	4
3	संशोधनाची उद्दिष्ट्ये	5
4	गृहितके	6
5	संशोधन पध्दती	7
6	प्रकरणनिहाय आराखडा	7
	1. मराठवाड्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी	
	2. सहकारी साखर कारखान्यांचा उदय व विकास	
	3. साखर कारखान्यांची अन्यसहाय्यकारी उत्पादने	
	4. ऊस आणि साखर उत्पादकांच्या जीवनात घडून आलेला आर्थिक व सामाजिक बदल	
	5. निष्कर्ष	9
7	संदर्भ साधने	9

- **प्रस्तावना :-**

जीवन जगत असतांना मानवाने आरंभापासून आजपर्यंत नानाविध बदल अनुभवले. मानव हा एक समाजशील प्राणी आहे. समाजात आपले जीवन जगतांना सहजीवन ही एक प्रक्रिया आहे, या प्रक्रियेतूनच सहकाराची कल्पना अस्तित्वात आल्याचे आपणांस आढळते. अगदी प्राचीन काळापासून मानवाने आपले विविध कार्य सहकार्याच्या माध्यमातून

पूर्ण केलेले आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करता यावी, आलेल्या प्रसंगाचा सामना योग्यरित्या करावा यासाठी सहकार हे महत्त्वाचे आहे, याची जाणीव मानवाला झाली आणि यातूनच सहकार याचा जन्म झाला. आजच्या आधुनिक काळात सहकार ही एक व्यापक संकल्पना म्हणून युरोप खंडात याची सुरूवात औद्योगिक क्रांतीनंतर झाली. यंत्रांच्या माध्यमातून विविध वस्तंूचे उत्पादन वाढवणे आणि यासाठी यंत्रांसोबत मानवी शक्तीचा वापर मोठया प्रमाणात वाढला. कामगारांचा एक मोठा वर्ग याच काळात युरोपमध्ये निर्माण झाला. समाजात भांडवलदार व मजुर असे दोन वर्ग निर्माण झालेत. कामगारांच्या जीवनावर यासर्व प्रक्रियेतून जे काही घातक परिणाम होत गेले, याला पर्याय किंवा या सर्व प्रश्नांची उकल म्हणून सहकारी संघटन ही संकल्पना मूळ धरू लागली. कामगारांना आपले जीवन अधिक सुखकर जगता यावे यासाठी सर्वप्रथम प्रयत्न हे इंग्लंडमध्ये इ. स. 1844 मध्ये रॉबर्ट ओवेन यांनी केले. भारतामध्ये इ. स. 1904 मध्ये सहकारी संस्था कायद्याच्या संमतीनंतर सहकारी चळवळ उभी राहिली. आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मागील दोन दशकांपासून भांडवलशाही व साम्यवादी अर्थव्यवस्था उपयुक्त ठरत असल्यातरी त्यामधील काही धोके हे आज जाणवू लागलेत. भांडवलशाही असो वा साम्यवादी या अर्थव्यवस्थेतील धोके टाळण्यासाठी सहकारी अर्थव्यवस्थेचा जन्म झालेला आहे. यामध्ये विविध संस्थाने समाविष्ट होतात, जसे सहकारी कारखाने, सहकारी बँका, सहकारी दूधसंघ यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.

महाराष्ट्रात सध्या एकूण 187 साखर कारखाने आहेत. त्यामध्ये 101 सहकारी व 86 खाजगी आहेत. तर देशात एकूण 530 साखर कारखान्यांपैकी 492 साखर कारखाने कार्यरत आहेत. देशातील सुमारे 05 कोटी शेतकरी 50 लाख हेक्टर क्षेत्रावर ऊसाचे पीक घेतात. इ.स. 1945 पर्यंत देशात सुमारे 145 संयुक्त साखर कारखाने होते. ज्यात महाराष्टाªतील सुमारे 12 कारखान्यांचा समावेश होता. इ.स. 1945 मध्ये स्व. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी देशातील पहिला यशस्वी सहकारी साखर कारखाना महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हîातील प्रवरानगर येथे इ.स. 1951 मध्ये सुरू केला. साखर उद्योग प्रामुख्यानेसहकार क्षेत्रातील असल्याने त्यानुसार भारत सरकारने कृषी प्रक्रिया उद्योगामध्ये सहकारी क्षेत्राच्या भूमिकेवर भर दिल्याने सहकारी साखर कारखान्यांनीे प्रगती करण्यास सुरूवात केली. महाराष्ट्रात ऊस लागवडीसाठी अत्यंत अनुकूल कृषी हवामान परिस्थिती होती.वरील सर्व बाबींचा विचार केल्यास ऊस उत्पादन व साखर उत्पादन वितरण यामध्ये मोठया प्रमाणात क्रांती झाल्याचे दिसून येते.

- **विषय निवडीचे महत्त्व :-**

महाराष्ट्राचा गोदावरी नदीच्या खोÚयात आणि आसपास वसलेला महत्त्वाचा प्रदेश म्हणून मराठवाडा हा विभाग आहे. यामध्ये एकूण आठ जिल्हîांचा

समावेश होतो. छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, हिंगोली, बीड, परभणी, नांदेड आणि लातूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. मराठवाड्याची राजधानी आणि औद्योगिक शहर म्हणून छत्रपती संभाजीनगर शहर आहे. तसेच नांदेड या शहराला मराठवाड्याची उपराजधानी म्हणून मान्यला आहे. महाराष्ट्रातील 16.84 टक्के लोकसंख्या या प्रदेशात राहते. या प्रदेशाचा 30.00 टक्के भाग पर्जन्यछायेत येतो. कोरडवाहू शेतीचे प्रमाण 90.00 टक्क्यांपर्यंत आहे.परिणामी दुष्काळाची सावली सतत या भागावर असते. शेती हा येथील मुख्य व्यवसाय आहे तसेच यावर आधारित पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन, गृहउद्योग, इ. चा समावेश होतो. मराठी भाषा ही या विभागाची मुख्य भाषा आहे.मराठवाड्यात जवळपास 50 साखर कारखाने आहेत. त्यापैकी 21 कारखाने हे सहकारी तत्त्वावर चालतात.

नांदेडमधील भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना देगाव, हिंगोलीमधील भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना डोंगरकडा, पूर्णा सहकारी साखर कारखाना वसमत, लातूरमधील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा विकास सहकारी साखर कारखाना, रेणा सहकारी साखर कारखाना, विलास सहकारी साखर कारखाना निवडी, विलास सहकारी साखर कारखाना तोंडार,पणगेश्वर सहकारी साखर कारखाना, मारोती महाराज सहकारी साखर कारखानाकिल्लारी, गोंदरी साखर कारखाना औसा, जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना नळेगाव,छत्रपती संभाजीनगरमधील संत एकनाथ सहकारी साखर कारखाना पैठण, सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना सिल्लोड, शरद सहकारी साखर कारखाना विहामांडवा ता. पैठण, जालनामधील मे. कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना अंकुशनगर ता. अंबड, समृध्दी/सागर सहकारी साखर कारखाना तीर्थपुरी ता. घनसावंगी, बीडमधील अंबा सहकारी साखर कारखाना अंबेजोगाई, कडा सहकारी साखर कारखाना आष्टी, गजानन सहकारी साखर कारखाना बीड, जय भवानी सहकारी साखर कारखाना गेवराई, माजलगाव सहकारी साखर कारखाना माजलगाव, विखे पाटील सहकारी साखर कारखाना केज तर धाराशिवमधील धाराशिव सहकारी साखर कारखाना चोराखळी, श्री गजानन सहकारी साखर कारखाना राजुरी, विट्ठल (उमरगा) सहकारी साखर कारखाना मुरूम हे सर्व कारखानेअसून याव्दारे तेथील भागातील रोजगार , उत्पन्न , व्यापार ही समस्या काही प्रमाणात कमी झाल्याचे जाणवते. भारताच्या किंवा महाराष्ट्राच्या साखर उत्पादनात यांचे मोलाचे योगदान आहे. त्याचसोबत इतर सहाय्यकारी उत्पादने जसे, इथेनॉल, अतिरिक्त न्यूट्रल, अल्कोहोल, जैव खते, बायो कंपोस्ट, पशुखाद्य, इ. चे होणारे उत्पादन यांचा मानवी तसेच संबंधित घटकावर अनुकूल परिणाम होतो.

मराठवाड्यातील सध्या कार्यरत असलेल्या व काही कालावधीनंतर बंद पडलेल्या (इ.स.1904 ते इ.स. 1993) साखर कारखान्यांची माहिती मिळवणे आणि त्यातील सहकारी साखर कारखान्यांचा ऐतिहासिक अभ्यास करुन त्याव्दारे समाजाच्या प्रगतीला

काही मदत निर्माण करणे.तसेच यापूर्वी या विषयावर संशोधन झालेले नसल्यामुळे हे संशोधन हाती घेतले आहे.मराठवाड्यातील सहकारी साखर कारखान्याचा यापूर्वी ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास आजपर्यंत कोणीही केलेला नसल्यामुळे संशोधकाला हा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

- **स्ंशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

संशोधकाने निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने खालील उद्दिष्ट्ये समोर ठेवली आहेत.

1. ऊस पुरवठा करणाÚया सर्वसामान्य ऊस उत्पादकांच्या जीवनात साखर कारखान्यांमुळे झालेल्या सामाजिक व आार्थिक बदलांची माहिती घेणे.
2. साखर कारखान्यांच्या उभारणीमुळे रोजगार निर्मितीच्या झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
3. साखर कारखान्यांच्या विविध सहाय्यकारी उत्पादनांचे बाजारपेठेतील स्थान अभ्यासणे.
4. साखर कारखान्यांनी राबविलेल्या शेतकरी हिताच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
5. साखर कारखान्यांच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेले उपक्रम अभ्यासणे.
6. संस्थापकांच्या योगदानाच्या माध्यमातून सहकारी साखर कारखान्यांच्या लोकोपयोगी कार्याचा आढावा घेणे.
7. सहकारी साखर कारखान्यांचे महत्त्व अभ्यासणे.

- **गृहितके :-**

1. मराठवाड्यातीलसहकारी साखर कारखान्यांचा हेतू अभ्यासता येणार.
2. सहकारी साखर कारखान्यांच्या निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेता येईल.
3. साखर व साखर किंवा ऊसजन्य पदार्थांची मागणी पूरवठा यांचा अभ्यास करता येणार.
4. बँका, पतसंस्था, दुधसंघ, ग्राहक सोसायट्या यांच्या बरोबरीने सहकारी साखर

कारखान्यांचे कार्य किती महत्त्वाचे आहे हे जाणून घेणे.

5. सहकारी साखर कारखाने यांच्या उद्योगांचा ऐतिहासिक अभ्यास करणे.

6. मराठवाड्यातीलसहकारी साखर कारखान्यांचा ऐतिहासिक अभ्यास करणे.

7. सहकारी साखर कारखान्यांचा बाजारपेठेतील स्थान व महत्त्व याचा अभ्यास करणे.

- **संशोधन पध्दती :-**

सदर विषयाचे संशोधन पूर्ण करण्यासाठी प्राथमिक, दुय्यम साधनांचा गरजेनुसार उपयोग करुन घेता येणार आहे. त्याचबरोबर संशोधन पध्दती, प्रश्नावली पध्दती, मुलाखत तंत्रे यांचा आधार घेवून संशोधन कार्य पूर्ण केले जाणार आहे.मराठवाड्यातीलगॅझेटीयर,साखर कारखाने स्मरणिका, वार्षिक अहवाल, स्थानिक ग्रंथालये यांचा संशोधनासाठी उपयोग करुन घेता येईल.

- **प्रकरणनिहाय आराखडा :-**

1. मराठवाड्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

मराठवाडा हा विभाग भौगोलिकदृष्ट्या सर्वसाधारण असा आहे. पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्याने दुष्काळाचे सावट सतत असते. परंतु ऐतिहासिक वारसा समृध्द आणि व्यापक स्वरुपाचा लाभला आहे. औसा आणि लातूर भागातील जमीन ही बागायती पीकांसाठी उपयुक्त आहे. हीच पार्श्वभूमी जिल्ह्यातील साखर कारखाने यांना फायदेशीर ठरली आहे.

2. सहकारी साखर कारखान्यांचा उदय व विकास :-

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा हा प्रदेश नैसर्गिक, भौगोलिक परिस्थिती आणि पाऊस कमी झाल्यामुळे दुष्काळी स्थितीत आहे. सहकारी साखर उद्योगामुळे ग्रामीण विकासात हातभार लागतो. मराठवाड्यातीलसाखर कारखान्यांची उभारणी सहकारी व खाजगी तत्त्वावर करण्यात आली. यामुळेच सदर विभागात साखर उद्योग यांचा विकास घडून आला.

3. साखर कारखान्यांची अन्य सहाय्यकारी उत्पादने :-

साखर कारखान्यांची ऊस संकलन व साखर वितरणाबरोबर इथेनॉल, अतिरिक्त न्यूट्रल, अल्कोहोल, जैव खते, बायो कंपोस्ट, पशुखाद्य, अल्कोहोल आधारित रसायने, इ. निर्माण करुन आपला लौकिक निर्माण केला आहे. याव्दारे कोट्यावधी रुपयांची उलाढाल

शक्य झाली आहे. उत्पादनांनी आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपला ठसा उमटवला आहे.

4. ऊस उत्पादक व साखर उत्पादक यांच्या जीवनात घडून आलेला आर्थिक व सामाजिक बदल :-

नांदेडमधील भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना देगाव, हिंगोलीमधील भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना डोंगरकडा, पूर्णा सहकारी साखर कारखाना वसमत, लातूरमधील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा विकास सहकारी साखर कारखाना, रेणा सहकारी साखर कारखाना, विलास सहकारी साखर कारखाना निवडी, विलास सहकारी साखर कारखाना तोंडार, पणगेश्वर सहकारी साखर कारखाना, मारोती महाराज सहकारी साखर कारखानाकिल्लारी, गोंदरी साखर कारखाना औसा, जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना नळेगाव,छत्रपती संभाजीनगरमधील संत एकनाथ सहकारी साखर कारखाना पैठण, सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना सिल्लोड, शरद सहकारी साखर कारखाना विहामांडवा ता. पैठण, जालनामधील मे. कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना अंकुशनगर ता. अंबड, समृध्दी/सागर सहकारी साखर कारखाना तीर्थपुरी ता. घनसावंगी, बीडमधील अंबा सहकारी साखर कारखाना अंबेजोगाई, कडा सहकारी साखर कारखाना आष्टी, गजानन सहकारी साखर कारखाना बीड, जय भवानी सहकारी साखर कारखाना गेवराई, माजलगाव सहकारी साखर कारखाना माजलगाव, विखे पाटील सहकारी साखर कारखाना केज तर धाराशिवमधील धाराशिव सहकारी साखर कारखाना चोराखळी, श्री गजानन सहकारी साखर कारखाना राजुरी, विठ्ठल (उमरगा) सहकारी साखर कारखाना मुरूम इ. नी या जिल्ह्यात क्रांती घडवून आणली आहे. ऊस उत्पादक सामान्य शेतकरी, कष्टकरी आणि अल्पभुधारकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ऊस उत्पादक आणि साखर कारखाने यांच्याशी संबंधित घटकांचा आार्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यास मदत झाली. या सर्व बदलांचा आढावा या प्रकरणात घेतला जाणार आहे.

➢ निष्कर्ष :-

प्रकरण क्रमांक एक ते चार यांच्या अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष या प्रकरणात मांडण्यात येतील.

➢ संदर्भ साधने :-

1. इंटरनेट

2. महाराष्ट्रातील जिल्हे - के. सागर

3. मराठवाड्यातील जिल्हा गॅझेटियर
4. साखर कारखान्यांचे वार्षिक अहवाल
5. साखर कारखान्यांच्या स्मरणिका
6. सहकार -प्रा. डॉ. माधव बिरादार
7. स्ंशोधन पध्दती - डॉ.डी.सी. सावंत व डॉ. रवि एन. सरोदे
8. सहकाराची मुलतत्त्वे - प्रा. प्र. रा. कुलकर्णी
9. योजना मासिक
10. वृत्तपत्रे
11. प्रत्यक्ष मुलाखती
12. प्रश्नावली